आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप!
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!


# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | **नाशिक** | वर्ष ५६ । अंक २८७ । मंगळवार, दि. २४ जून २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर




पान २
मुंबई वार्तापत्र : तृतीय भाषा म्हणून हिंदी सक्ती कशासाठी?



शेवटचे पान
इंग्लंडला तगडे आव्हान

## संपादकीय

### बदलाचे आशादायी उदाहरण

सार्वजनिक आरोग्यसेवा हा शब्द उच्चारला तरी लोकांच्या नजरेपुढे एक ठराविक चित्र उभे राहाते. ते अतिशयोक्त नसल्याचे अनुभव लोक वारंवार घेतात. उदाहरणार्थ, महाराष्ट्र राज्यातील सरकारी आरोग्य व्यवस्था कागदावर बळकट असू शकेल. तथापि वास्तवात हजारो पदे रिक्त आढळतात. अधूनमधून त्यांची भरती प्रक्रिया सुरु होते. पण त्याचे पुढे काय होते? जसे की, सुमारे पंधरा दिवसात चारशे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरली जातील अशी माहिती राज्याच्या आरोग्य मंत्र्यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये माध्यमांना दिली होती. ती पदे भरली गेली का? मुळात इतकी महत्वाची पदे पंधरा दिवसात भरली जाऊ शकतात तर ती रिक्त राहिली कशी? त्याव्यतिरिक्त दोन हजार रिक्त पदांची भरतीप्रक्रिया सुरु झाली का? झाली असेल तर तिचा अंतिम टप्पा काय आहे? हे लोकांना कधीच कळत नाही. सरकारी कर्मचाऱ्यांची काम करण्याची मानसिकता आणि सरकारी रुग्णालयातील डॉक्टर आणि रुग्ण संवाद हा नेहमीच वादाचा विषय ठरतो. काही रुग्णालयात उपचारपूरक यंत्रे असतात पण त्यासाठीचे तंत्रज्ञ नसतात. ते उपलब्ध असले तर यंत्रे नादुरुस्त असतात. अनेकदा रुग्णांना खासगी रुग्णालयात घेऊन जाण्यास सुचवले जाते. पायाभूत सुविधांचीच वानवा असल्याने स्वच्छता, वातावरण, रुग्णांना मिळणारी वागणूक याकडे लक्ष कमीच वेधले जाते. तरीही सरकारी रुग्णालये नेहमीच गर्दीने ओसंडून वाहतात. कारण वैद्यकीय उपचार दिवसेंदिवस महागडे होत चालल्याने सरकारी दवाखान्याशिवाय लोकांकडे दुसरा पर्याय नसतो. हे जरी महाराष्ट्रातील चित्र असले तरी इतर राज्यातील आरोग्य सेवेची परिस्थिती फारशी वेगळी नसू शकेल. हे चित्र बदलण्यासाठी सरकारलाच कंबर कसावी लागेल. त्याची सुरुवात हैदराबाद सनतनगर येथील कामगार विमा योजनेचे मेडिकल कॉलेज व रुग्णालयाने केली असे म्हटले जाऊ शकेल. या प्रवासाची कथा माध्यमांत प्रसिद्ध झाली आहे. या रुग्णालयातून एकाही रुग्णाला दुसऱ्या रुग्णालयात पाठवले जात नाही. गेल्या तीन वर्षात रुग्णालयात २६ किडनी प्रत्यारोपण यशस्वी झाले. सुमारे पंधराशेहून अधिक ओपन हार्ट सर्जरी, मेंदू व मणके शस्त्रक्रिया, जटील प्रसूती झाल्या आहेत. रुग्णालयात सुमारे सहा हजार चाचण्या केल्या जातात. दररोज सरासरी तीन हजार रुग्ण सेवेचा लाभ घेतात असे प्रसिद्ध झालेल्या वृतात म्हटले आहे. हा बदल विलक्षण आशादायी आहे. सरकारी आरोग्य सेवेची पारंपरिक प्रतिमा बदलाचे आव्हान त्यांनी कसे पेलले? त्यासाठी कशा प्रकारचे नियोजन केले गेले? मानसिकता बदल कसा घडवून आणला? यासाठी हैदराबाद रुग्णालय बदल हा अभ्यासाचा विषय ठरू शकेल.

### तापमान

| | | |
|---|---|---|
| किमान | : | २२.१° |
| कमाल | : | २४.९° |



# गोदावरीला दुसऱ्यांदा पूर

## गंगापूर धरणातून १५,७७५ क्यूसेकने विसर्ग

**नाशिक । प्रतिनिधी**

सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर काल दिवसभर पावसाची अधूनमधून जोरदार रिपरिप सुरू होती. गंगापूरच्या पाणलोटातील अंबोली येथे सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत १२ तासांत १०६ मि.मी. पावसाची नोंद झाली. नवीन पाण्याची आवक झाल्याने विसर्ग ६,१६० क्यूसेकवर नेण्यात आला आहे. यामुळे गोदावरीला नदीला जून महिन्यातच दोनदा पूर आला. रात्री ९ वाजता गंगापूरचा विसर्ग ९,४६५ क्यूसेकवरून १५,७७५ क्यूसेक करण्यात आला आहे. दारणा धरणाच्या पाणलोटातही पावसाने दमदार हजेरी लावली.

पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या दमदार पावसामुळे धरणांच्या पातळीत वेगाने वाढ होत आहे. त्यामुळे रोजच विसर्ग वाढत असल्यामुळे गोदावरी नदीच्या पातळीत झपाट्याने वाढ झाली असून, नदीलगतच्या गावांमध्ये पूर स्थितीचा धोका निर्माण झाला आहे. गोदावरीतून काल सायंकाळी ६ वाजता मागील १२ तासांत १०४१३ क्यूसेक वेगाने पाणी जायकवाडी जलाशयात दाखल होत होते. धरणाचा साठा ३५.३२ टक्के तर भंडारदरा धरणाचा पाणीसाठा ४३.२६ टक्के झाला आहे.

### पाण्याचा विसर्ग

| | |
|---|---|
| गंगापूर | १५,७७५ |
| दारणा | ४,७४२ |
| कादवा | ७९५ |
| होळकर ब्रिज | ४,८८१ |
| नांदुरमध्यमेश्वर | ९,४६५ |

### धरणसाठा (टक्क्यांमध्ये)

| | |
|---|---|
| गंगापूर | ६१.८७ |
| पालखेड | २७.४० |
| ओझरखेड | २४.३८ |
| दारणा | ५१.३३ |
| भोजापूर | ६७.०४ |
| गिरणा खोरे | २७.७७ |
| पुनद | ३९.३८ |
| वाकी | ४९.८४ |
| भाम | ३९.९८ |
| भावली | ६२.०९ |
| मुकणे | ४७.५६ |
| वालदेवी | ४५.१९ |
| कडवा | ४५.९१ |
| आळंदी | २८.८० |

# निवडणुका दिवाळीनंतरच

## आता ६ ऑक्टोबरला अंतिम प्रभागरचना

- **राज्य निवडणूक आयोग अंतिम मान्यता देणार**
- **प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक**

**मुंबई/नाशिक । प्रतिनिधी**

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या प्रभागरचना ऑक्टोबर महिन्यात अंतिम होणार आहे. प्रभागरचना प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक जाहीर झाले आहे. त्यानुसार महापालिका, नगरपालिका निवडणुका ऑक्टोबर महिन्यानंतरच म्हणजेच दिवाळीनंतरच निवडणुकांचे फटाके फुटणार आहेत. महापालिका, नगरपालिकांच्या प्रभागरचना अंतिम करण्यासाठी चार महिन्यांचा कालावधी लागणार आहे. मुंबई महापालिका प्रभागरचना ६ ऑक्टोबरनंतर तर ड वर्ग महापालिका प्रभागरचना १३ ऑक्टोबरला अंतिम होणार आहे.

विविध कारणांनी मागील सुमारे तीन वर्षापासून रखडलेल्या महापालिका निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुहूर्त लागले होते. शासनाने याबाबत चार सदस्यीय प्रभागरचना करण्याचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार

पान १० वर

### असे आहेत टप्पे

- ११ ते १६ जून दरम्यान प्रगणक गटाची मांडणी, प्रारुप प्रभागरचना तयार करणे
- १७ जून ते ३१ जुलै दरम्यान जनगणनेची माहिती तपासणे, स्थळ पाहणी, गुगल मॅप वर प्रभागाचे नकाशे तयार करणे, प्रारूप प्रभागरचनेचा मसुदा तयार करून त्यावर समितीने स्वाक्षऱ्या करणे.
- १ ऑगस्ट ते ५ ऑगस्टदरम्यान प्रारुप प्रभागरचनेचा प्रस्ताव नगरविकास विभागास सादर करणे
- ६ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट दरम्यान प्रारुप प्रभागरचनेचा प्रस्ताव नगर विकास विभागाने राज्य निवडणूक आयोगाला सादर करणे. राज्य निवडणूक आयोगाने प्रारूप प्रभागरचनेस मान्यता देणे.

पान १० वर

## पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प ठरलेल्या मार्गानेच व्हावा

### समितीची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

जीएमआरटी प्रकल्पाचे कारण सांगत, पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा मार्ग बदलला जात आहे. बदललेल्या मार्गामुळे प्रवाशांचा प्रवास लांबणार आहे. त्यामुळे पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प पुणे-चाकण-संगमनेर-सिन्नर-नाशिक असा पूर्वीच्याच सरळ मार्गानेच व्हावा, अशी मागणी रेल्वेच्या पुणे मुख्यालयात झालेल्या बैठकीत सोमवारी (दि.२३) केली.

पुणे व सोलापूर विभाग रेल्वे समितीची बैठक सोमवारी विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, पुणे येथे पार पडली.

सविस्तर वृत्त पान १० वर

# एसटीचा संचित तोटा १० हजार कोटींपेक्षा अधिक

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सोमवारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची अर्थात एसटीची सध्याची आर्थिक स्थिती दर्शविणारी श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली. आर्थिक संकटात सापडलेल्या आणि राज्य सरकारकडून मिळणाऱ्या मदतीवर आजपर्यंत तगून असलेल्या एसटी महामंडळाचा संचित तोटा १० हजार ३२२ कोटींवर गेला आहे. गेल्या ४५ वर्षात केवळ आठ वर्ष महामंडळ थोडेफार फायद्यात राहिले आहे. खर्चात कपात, महसूल वाढीचे प्रयत्न व व्यावसायिक व्यवस्थापन यांच्या माध्यमातून महामंडळाला आर्थिक गर्तेतून बाहेर काढण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

या श्वेतपत्रिकामध्ये मागील ४५ वर्षांच्या कारभाराचा आढावा घेण्यात आला आहे. या ४५ वर्षांपैकी फक्त आठ वर्षांत महामंडळाला काही प्रमाणात नफा झाला आहे. तर उर्वरित सर्व वर्षांत महामंडळाला मोठा तोटा झाला आहे. त्यामुळे महामंडळाचा संचित तोटा १० हजार कोटी रुपयांच्या पुढे गेला आहे. यात प्रामुख्याने मागच्या सात-आठ वर्षात वाढ झाली आहे.सन २००१-०२ पासून २०२३-२४ पर्यंत राज्य सरकारने महामंडळाला ६ हजार ३५३ कोटी ८० लाख रुपयांची भांडवली मदत केली. मागील ७ वर्षांच्या कालावधीत सरकारच्या परिवहन विभागाकडून २ हजार ३५५ कोटी २९ लाख तर आदिवासी विकास विभागाकडून ४२ कोटी ९६ लाख रुपये महामंडळास देण्यात आले आहेत.

# मोकाट गायींची लढाई वृद्धाच्या जीवावर बेतली

**कळवण । प्रतिनिधी**



मोकाट फिरणाऱ्या दोन गायींच्या लढाईत एका वृद्धाला नाहक प्राण गमवावे लागले.हा हृदयद्रावक घटना कळवणमध्ये घडली.या प्रकारामुळे मोकाट जनावरांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

कळवण शहरातील जुना ओतूररोडवरील कळवण मर्चंट्स को ऑफ बँकेजवळील श्री सायबर कॅफेसमोर मोकाट

पान १० वर

## अमेरिकेच्या हल्ल्याला इराणचे प्रत्युत्तर

**तेहरीन ।** अमेरिकेच्या हल्ल्याला इराणने प्रत्युत्तर दिले असून, कतारमधील सर्वात मोठ्या अमेरिकन हवाई तळाला निशाणा बनवत सहा क्षेपणास्त्रे डागली आहेत. कतारची राजधानी दोहापासून जवळ असलेल्या अल उदीद या अमेरिकन लष्करी तळावर आठ हजाराहून अधिक सैन्य तैनात असतात. त्याच ठिकाणी इराणने हल्ला केला आहे.

# अभियंत्यांच्या बदल्यांना मुख्यमंत्र्यांचा ब्रेक

## बांधकाम विभागातील १७० अभियंते प्रतीक्षेत

**मुंबई । प्रतिनिधी**

बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सार्वजनिक बांधकाम विभागासह ग्रामविकास, पाणीपुरवठा विभागातील उपविभागीय अभियंत्यांच्या बदल्या रोखून ठेवल्याचे समजते. अभियंत्यांच्या बदल्यांची फाईल मंजूर करावी म्हणून संबंधित विभागाच्या सचिवांना मंत्री कार्यालयातून सतत फोन जात आहेत. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या सक्त सूचनांमुळे सचिवांनी

पान १० वर

### मंत्री कार्यालयातील ओएसडी माघारी

मुख्यमंत्री कार्यालयाने सार्वजनिक बांधकाम मंत्री कार्यालयातील दोन तर राज्यमंत्री कार्यालयातील तीन ओएसडींना माघारी पाठवल्याचे समजते. या ओएसडींची रवानगी त्यांच्या मूळ विभागात केली गेल्याने या निर्णयाबद्दल मंत्री कार्यालयात उलटसुलट चर्चा सुरु आहे.






नाशिक ■ नाशिक ■ जळगाव ■ धुळे ■ नंदुरबार ■ अहमदनगर येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित
www.facebook.com/deshdoot
cmyk